सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक:- पीडब्ल्यूडी-४२१८/सीआर-२४/२०१८/तीन दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२१

## घोषणा

**विषय:-** दिव्यांग व्यक्ती लिहिण्याकरीता सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्या वेळी लेखनिक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्या वेळी दिव्यांग उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्या वेळी लेखनिक तसेच अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने दिनांक ४ मार्च, २०२० रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर ‘दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना’ प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणा-या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी लेखकाची मदत घेण्याची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह विनंती अर्ज (प्रपत्र-१) सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

**२.** आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या खालील जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केलेल्या व लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह pre-examination@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर दिनांक ५ मार्च, २०२१ पर्यंत पाठवणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | परीक्षेचा वार व दिनांक |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा-२०२० | शनिवार, २७ मार्च, २०२१ |
| २ | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब पूर्व परीक्षा-२०२० | रविवार, ११ एप्रिल, २०२१ |

**३.** केवळ संबंधित जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करताना लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीकरीता दावा केला म्हणून उमेदवारांना लेखनिक/अनुग्रह कालावधीची सवलत देय असणार नाही. ऑनलाईन अर्जाद्वारे दावा करुन उमेदवारांनी विहित पध्दतीने आयोगाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घेतली असल्यास लेखनिक/अनुग्रह कालावधीची सवलत देय राहील.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग